महा मेट्रो
NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## नागपूर मेट्रोत नोकरी लावून देण्याचे खोटे अमिश; सुरक्षा रक्षक निलंबित



नागपूर : नागपूर मेट्रोत नोकरी लावून देण्याचे खोटे अमिश दाखवत पैसे घेणाऱ्या सुरक्षा रक्षकाला निलंबित केले आहे. रुपेश शेंडे नावाच्या या सुरक्षा रक्षकाने अक्षय नगराळे नावाच्या आपल्या नातेवाईकाकडून मेट्रोत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत ₹ ५०,००० घेतले होते. आपण फसल्याचे समजल्यावर अक्षय नगराळे याने अजनी पोलीस ठाण्यात या संबंधी तक्रार केली होती.

या संपूर्ण प्रकरणाची नागपूर मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेतली. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश आऊट सोर्सिंग एजन्सीला दिले. एजन्सी रुपेश शेंडेचे या प्रकरणा संबंधी बयान नोंदवले. कबुलीजबाब देत रुपेश शेंडेने अक्षय नगराळे कडून पैसे घेतल्याचे मान्य केले. रुपेश ने कबुलीजबाब दिल्यावर आऊट सोर्स एजन्सीने त्याला निलंबित केले.

पैशांची मागणी करत महा मेट्रोत नोकरी लावून देण्याचे आमिष दिले जाण्याचे आणि अश्या प्रकारे फसवणुकीचे प्रकार शहरात होत असून नागपूर मेट्रोने या संबंधित नागरिकांना सातत्याने सतर्क केले आहे. अश्या कुठल्याही पद्धतीने नागपूर मेट्रोत नोकरी मिळत नसून या बद्दल नोकरी करता प्रयत्न करणाऱ्यांनी सतर्क राहावे असे आवाहन नागपूर मेट्रो करीत आहे.आजवर या संबंधाने शहराच्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्ह्याची नोंद देखील झाली आहे.

महा मेट्रो तर्फे या संबंधाने सातत्याने पाठ पुरावा करत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न होत असतात. या संबंधाने मेट्रो तर्फे बातम्या देखील दिल्या आहेत. मेट्रो तर्फे पदभरती होत असतांना त्या संबंधीची सर्व माहिती महा मेट्रोची वेबसाईट www.mahametro.org व प्रतिष्ठित वर्तमान पत्रांमध्ये प्रकाशित केल्या जाते. त्यामुळे पदभरती संबंधी कुठलीही माहिती मिळाल्यास याची संपूर्ण शहानिशा महा मेट्रोची ऑफीशीयल वेबसाईट (संकेत स्थळ) किंवा मेट्रो भवन कार्यालयातून करावी असे आव्हान महा मेट्रो,नागपूर तर्फे नागरिकांना केले जात आहे. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करत जागरुक राहून सर्व सामान्य नागरिकांनी,विशेषतः तरुणांनी अश्या भूलथापांना किंवा अफवांना बळी पडू नये हे आवाहन महा मेट्रो तर्फे केले जात आहे.